# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director (I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/ 278 /2018** **Dt: 12/01/2018**

प्रति,

मा. प्राचार्य/ रासेयो कार्यक्रम अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना सलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषयः— राज्यस्तरीय विशेष शिबीरामध्ये रासेयो स्वयसेवक पाठविण्याबाबत.**

संदर्भ :— क्रमाक : रासेयो —२०१७/प्र. क्र. १९२/साशि — ७ दिनांकः २६ डिसेंबर २०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये मा. राज्य संर्पक अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांनी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपुर यांना दिनांक **२९ जानेवारी २०१८ ते ०४ फेब्रुवारी २०१८** या सात दिवसाच्या कालावधीत मु. पो. विसापुर, तह. बल्लारपुर जि. चंद्रपुर येथे राज्यस्तरीय विशेष शिबीर आयोजनाची मान्यता प्रदान केलेली आहे. सदर शिबीराकरीता **गडचिरोली जिल्हयातून १० रासेयो स्वयंसेवक व चंद्रपूर जिल्हयातील १० रासेयो स्वंयसेवक** पाठवायचे आहे. करीता गडचिरोली जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना **जिल्हा समन्वयक डॉ. शशिकांत गेडाम** व चंद्रपूर जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना **जिल्हा समन्वयक डॉ. नथ्थु गिरडे** यांच्याकडे आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांची नावे दि. २० जानेवारी २०१८ पर्यंत पाठवून शिबीर यशस्वी करण्याकरीता सहकार्य करावे, ही विनंती.

धन्यवाद!

मा. डॉ. शशिकांत गेडाम मो. न. ८९२८८९२७७७ dr.shashigedam@rediffmail.com
मा. डॉ. नथ्थु गिरडे मो. न. ९४२३६७५८८१ girdenss@gmail.com

सहपत्रः शिबीर कार्यक्रम पत्रिका

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यपीठ,गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

व

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

# राज्यस्तरीय विशेष शिबीर

## ❖ तपशिल ❖

---

१) शिबीर स्थळ : राष्ट्रीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय, विसापूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर.

२) शिबीर कालावधी : २९ जानेवारी २०१८ ते ४ फेब्रुवारी २०१८ पर्यंत

३) शिबीरात उपस्थित होण्याचा दिवस व वेळ : सर्व शिबीरार्थ्यांनी सोमवार दि. २९ जानेवारी २०१८ सकाळी १२.०० वा.

४) शिबीराची दिनचर्या :

| | | |
|---|---|---|
| पहाटे | ५.०० ते ६.०० वा. | जागर |
| सकाळी | ६.०० ते ७.३० वा. | प्रार्थना, व्यायाम, निसर्गोपचार व योगसाधना |
| सकाळी | ७.३० ते ८.०० वा. | अल्पोपहार |
| सकाळी | ८.०० ते १२.००वा. | श्रमसंस्कार व स्नान |
| दुपारी | १.०० ते २.०० | भोजन |
| दुपारी | २.०० ते ३.०० | विश्रांती |
| दुपारी | ३.०० ते ५.०० | बौद्धिक सत्र |
| सायंकाळी | ६.०० ते ७.०० | सामुहिक प्रार्थना |
| रात्री | ७.०० ते ९.०० | सांस्कृतिक कार्यक्रम |
| रात्री | ९.०० ते १०.०० | जेवण |
| रात्री | १०.३० | विश्रांती |

५) निवास व भोजन : सर्व शिबीरार्थ्यांची निवास व भोजनाची व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात येईल.

६) प्रवास खर्च : शिबीरार्थ्यांचा प्रवास खर्च संबंधित महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना च्या नियमीत अनुदानातून करावा.

७) शिबीरातील विशेष :

1) श्रमसंस्कार
2) स्वच्छतेचे महत्त्व
3) व्यक्तीमत्व विकास
4) व्यसनमुक्ती
5) अंधश्रद्धा निर्मुलन
6) आरोग्य जन जागरण
7) मानवी मुल्य
8) महिला सबलिकरण
9) जलव्यवस्थापन
10) स्वच्छता व आरोग्य विषयी जागरूकता
11) शिक्षण व स्वयंरोजगार
12) वृक्ष संवर्धन
13) रोखरहीत अर्थव्यवस्था

## अ) शिबीराची नियमावली :

1) ओळखपत्र (Identity Card), प्राचार्य व कार्यक्रम अधिकाऱ्यांचे अधिकृत पत्र
2) शिबीरार्थी आपल्या पालकाच्या व महाविद्यालयाच्या संमतीने शिबीरात सहभागी होत आहे असे गृहीत धरून शिबीरात एखादा अपघात वा दुखापत झाल्यास व अन्य कारणांनी, शिबीरार्थ्यांना व पालकांना नुकसान भरपाई मागता येणार नाही.
3) शिबीरात एकदा दाखल झाल्यावर शिबीर सोडून आपल्या मर्जीप्रमाणे गावाला व अन्य ठिकाणी जाता येणार नाही.
4) शिबीराच्या संपूर्ण कालावधीत शिस्त पाळावी व शांतता राखावी लागेल.

५) राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर सहजीवन शिबीर असून आपल्यापासून सोबत राहणाऱ्या कुणालाही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. परस्पराबद्दल अनुचित व असभ्य शब्दांचा वापर करू नये.
६) शिबीर प्रमुखांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांचे पालन करावे.
७) कोणत्याही व कशाच्याही संदर्भात अंतिम निर्णय हा प्राचार्यांचा राहिल तो मान्य करणे व त्यानुसार वागणे हे शिबीरार्थ्यांना अनिवार्य राहिल.
८) बेशिस्तपणा नजरेस आल्यास त्या विद्यार्थ्यांला शिक्षा करण्यात येईल व त्याचे नांव संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येईल.
९) नेमून दिलेले काम व प्रकल्प जबाबदारीने पूर्ण करावे लागेल.
१०) प्रकल्पाचा अहवाल ठरवून दिलेल्या वेळातच द्यावा लागेल.
११) कोणालाही मद्यपान, धुम्रपान, गुटखा व मादक पदार्थांचे सेवन करता येणार नाही.
१२) शिबीर कालावधीत घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.
१३) सर्व शिबीरार्थ्यांची भोजन व निवासाची व्यवस्था आयोजकातर्फे करण्यात येईल.
१४) महाविद्यालयानी शिबीरार्थ्यांचा प्रवासखर्च नियमित रा.से.योजनेच्या अनुदानातून करावा.
१५) **शिबीरार्थ्यांनी विद्यापीठ/ महाविद्यालयाचा बॅनर सोबत आणावा.**

**ब) सांस्कृतिक कार्यक्रम :**

शिबीरात सादर करण्यात येणारे सांस्कृतिक कार्यक्रम रा.से.योजनेच्या उपक्रमांना साजेसे असावे. लोकप्रबोधन व जनजागृती ही उद्दीष्टये असलेल्या कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात येईल. सांस्कृतिक कार्यक्रमाला लागणारे साहित्य स्वयंसेवकांनी आपल्या सोबत आणावे.

**क) शिबीरार्थ्यांनी सोबत आणावयाचे साहित्य :**

१) थंडीचे दिवस असल्यामुळे पुरेसा बिछाना
२) रा.से.यो.चे बॅच, डायरी, वही, पेन, टॉर्च
३) साबून, कंगवा, तेल, ताट, वाटी, पेला, चम्मच इत्यादी साहित्य सोबत आणावे.
४) कोणत्याही मौल्यवान वस्तू जसे मोबाईल, दागीणे, कॅमेरा इत्यादी आणल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी स्वत: विद्यार्थ्यांची राहील.
५) औषधाची गरज असल्यास औषध सोबत आणावे.

**संपर्क : शिबीरासंदर्भातील अधिक माहितीसाठी खालील व्यक्तींशी संपर्क साधावा.**

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. आर. पी. इंगोले | मो.नं. ९४२२१३७५५६ |
| २) | प्रा. कुलदीप आर. गोंड | मो. नं. ९६६५४२४४०१ |
| ३) | डॉ. उषा खंडाळे | मो.नं. ९४२३६४५५५९ |
| ४) | प्रा. राजकुमार बिरादार | मो.नं. ९९२१८४७४९० |
| **५)** | **डॉ. सौ. शरयु पोतनुरवार** | **मो.नं. ९४२२१४६३४५** |

(टिप : विसापूर हे गांव चंद्रपूर–बल्लारशहा रोडवर चंद्रपूर पासून १२ कि.मी. व बल्लारशहा पासून ७ कि. मी. अंतरावर आहे. चंद्रपूर मध्यवर्ती बसस्थानक व बल्लारशहा मध्यवर्ती बसस्थानकावरून विसापूर (फाटा) जाण्यासाठी एस.टी. बसेस उपलब्ध आहेत. ट्रेन : भुसावळ–बल्लारशाह पॅसेंजर वर्धेवरून सकाळी ७.०० वा. ची आहे. ही ट्रेन विसापूरला १०.०० वा. पोहचते. मुंबईवरून येणारी सेवाग्राम एक्सप्रेसने शिबीरस्थळी पोहचने सोईचे आहे.)

**Gondwana University, Gadchiroli**

Sarvodaya Shikshan Mandal's

# SARDAR PATEL MAHAVIDYALAYA, CHANDRAPUR

## STATE LEVEL CAMP

## NATIONAL SERVICE SCHEME

Venue : Rashtriya Sharirik Shikshan Mahavidyalaya,
At.-Visapur, Ta.-Ballarpur, Dist. Chandrapur.

**(29th January 2018 to 4th Feb. 2018)**

## Registration Form

1) Name of the Student (Capital Letter) : ______________________________

______________________________

2) Name of the College : ______________________________

3) Class : ______________________________

4) Blood Group : ______________________________

5) Date of Birth : ______________________________

6) Home Address of the Student : ______________________________

7) Mobile No. : ______________________________

8) E-mail. Id : ______________________________

9) Experience in NSS (Year) : ______________________________

10) Camp Attended (Village Name) : ______________________________

11) Hobby : ______________________________

12) Special Skill Art : ______________________________

13) Any Other Activities : ______________________________

14) Interesting Field : ______________________________

15) Height/Weight : Height --------- Weight----------

16) Remark ______________________________

Signature of N.S.S. Volunteer

Signature of Programme Officer N.S.S. & Seal

Principal

# —जोखीम पत्र —

माझ्या विनंतीवरून माझे नाव दाखल झाल्यामुळे कुठल्याही प्रकारचे शिबीर/सत्र/रासेयो अंतर्गत येणारे साहस प्रशिक्षण उपक्रम व प्रवास अनुभवत असतांना, मी जबाबदारीपूर्वक असे स्वीकार करतो/करते की प्रशिक्षण/कुठल्याही प्रकारची वा मालमत्तेचे नुकसान वा व्यक्तीला झालेले नुकसान (नुकसानीमुळे मृत्यू झाल्यास) या संदर्भात मी अथवा माझे व्यवस्थापक/प्रशासक भारत सरकारच्या विरोधात किंवा कुठल्याही रासेयो अधिकाऱ्यांच्या विरोधात/प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी/कार्यक्रम समन्वयक/राज्य संपर्क अधिकारी/युवा अधिकारी/सहायक कार्यक्रम सल्लागार/सह कार्यक्रम सल्लागार यांच्या विरोधात कुठल्याही प्रकारचा दावा करणार नाही आणि अशी कुठलीही हानी किंवा नुकसान (नुकसानीमुळे मृत्यु झाल्यास) झाल्यास भारत सरकार वा वर निर्देशित केलेला कुठलाही अधिकारी यावर नुकसान भरपाई देण्याचे दायित्व राहणार नाही असे मी समजतो.

मी असे स्विकार करतो की, मी माझे व्यवस्थापक व प्रशासक हे भारत सरकार कुठल्याही रासेयो अधिकारी वा भारत सरकारच्या सेवेतील कोणतीही व्यक्ती यावर कोणताही दावा करणार नाही. तृतीय पक्षकार म्हणून त्यांच्या विरोधात जाणार नाहीत किंवा वर निर्देशित प्रशिक्षण शिबिर/सत्र/रासेयो शिबिर/प्रजासत्ताक दिन संचालन/साहस प्रशिक्षण शिबिर व रस्ता/रेल्वे/समुद्र/नदी व विमान या संदर्भात हलगर्जीपणाच्या कुठल्याही वृत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत विरोधात जाणार नाहीत.

**स्वयंसेवकांची सही**

सहीचे साक्षीदार : १)....................................

२) ...................................

माझा पाल्य ही/ही माझ्या संमतीने रासेयो, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर यांच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय रा.से.यो. विशेष शिबीरात सहभागी होत आहे.

पालकांची सही

स्थळ :
दिनांक :

Annuxure - 3

# Certificate of Medical and Physical Fitness

Signature of the candidate :---------------------------------------------------------------

that I have examined S/o D/o : ------------------------------------------------------------------ I

do here certify Mr./Mrs. : -----------------------------------------------------------------

------------------ and found it fit for undergoing rigorous training for National Camp/Pre-Republic Day Camp/Adventure Camp/NSS State Level Camp.

The candidate whose signature is given above is not suffering from any communicable or chronic disease, which may cause any hindrance in his/her participation in the above mentioned rigorous training programme.

Station : ----------------------

Dated : ----------------------

Signature of the Medical Officer

Name with seal